70

ISSN 2454-3292

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year-VI, Issue - XI, Vol.-IV
Impact Factor 6.10
(GRIFI)
Sept. 2019 To Feb. 2020

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.
GADHINGLAJ

INDO ASIAN PUBLICATION

EDITOR IN CHIEF

Prof. Dnyanraja Chighalikar

IAP Issue : XI, Vol. IV
I W R J
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2454-3292
Sept. 2019 To Feb. 2020

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे विलीनीकरण : मलमपट्टी की संजीवनी<br>**डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे** | 1 |
| 2 | सर्वसमावेशक वृद्धी आणि भारत<br>**कैलास सत्यवान शेलार** | 10 |
| 3 | वर्धनगड - एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ<br>**डॉ. खंडेराव शिंदे** | 15 |
| 4 | मा. खा. कै. सदाशिवराव मंडलिक यांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा<br>**पांडुरंग राणबा फराकटे** | 19 |
| 5 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यासमोरील आव्हाने : एक दृष्टीक्षेप<br>**बाबली गंगाराम गावडे** | 23 |
| 6 | तौलनिक साहित्याभ्यासातील अनुवादाचे महत्व व आवश्यकता<br>**डॉ. भरत जाधव** | 27 |
| 7 | जागतिकीकरण आणि मराठी स्त्रीवादी साहित्य<br>**डॉ. सुखदेव नारायण एकल** | 31 |
| 8 | बोलीनिर्मितीची प्रक्रिया<br>**आशालता नारायण खोत** | 35 |
| 9 | देवदासी चळवळीतील गौराबाई सलवादे यांचे योगदान<br>**कु. हर्षदा आण्णापा कुंबळाळे** | 39 |
| 10 | जागतिकीकरणाचा मराठी भाषेवरील परिणाम<br>**श्रीरंग अरविंद तराळ** | 44 |
| 11 | स्त्री-पुरुष समानता<br>**संध्या ज. माने** | 50 |
| 12 | बदलती जीवनशैली आणि अपले आरोग्य<br>**सुरेश गणपतराव धुरे** | 54 |
| 13 | महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रातील चळवळीत - स्त्रियांचा सहभाग एक समाजशास्त्रीय विश्लेषण<br>**डी.एस. काळे** | 58 |
| 14 | समाज माध्यम : एक चिकित्सक अभ्यास<br>**बळवंतराव क. जाधव** | 62 |


ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GADHINGLAJ
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.

| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 15 | कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्या<br>**डी.जी. चिघळीकर, डॉ. एल.एच. पाटील** | 67 |
| 16 | महाविद्यालयीन शिक्षक-प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त रजांच्या अद्यावत तरतूदी<br>**राजेंद्र आप्पासाहेब तराळ** | 72 |
| 17 | विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या २० वर्षातील कार्याचा आढावा<br>**गौतम गणपती काटकर** | 81 |
| 18 | शासनाच्या निर्मल ग्राम योजनेच्या अनुषंगाने नेसरी ग्रामपंचायतीची दिशा<br>**जे.के. ससाने** | 87 |
| 19 | कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाचे योगदान (इ.स. १९६२ ते २००२)<br>**तुकाराम महादेव पाटील** | 94 |
| 20 | संविधानिक नैतिकतेलाच आव्हान<br>**डॉ. आण्णासाहेब हरदारे** | 99 |
| 21 | आजची तरुणाई आणि सोशल मिडीया - एक सामाजिक समस्या<br>**अजिंक्य दत्तात्रय पाटील** | 103 |
| 22 | ऐतिहासिक दृष्टिकोनातून पर्यटन<br>**डॉ. संजय हणमंत भोसले** | 106 |


ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj. Dist.Kolhapur.
GADHINGLAJ

IMPACT FACTOR 6.10

ISSN 2454-3292

Indo Western Research Journal (IWRJ)
Issue : XI, Vol. : IV
Sept. 2019 To Feb. 2020
www.irasg.com

Research Paper 7 Marathi

# जागतिकीकरण आणि मराठी स्त्रीवादी साहित्य

**डॉ. सुखदेव नारायण एकल**
मराठी विभाग,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**प्रस्तावना**

जागतिकीकरण आणि मराठी साहित्य साहित्य या अनुषंगाने विचार करताना जागतिकीकरणाचा एकूणच मराठी साहित्यावर खोलवर असा परिणाम झालेला दिसून येतो. जागतिकीकरणाने मानवी जीवनासंदर्भात निर्माण केलेल्या अनुकूल प्रतिकूल प्रश्नांचा वेध मराठी साहित्याने घेतलेला दिसतो. प्रामुख्याने अलिकडच्या काळातील मराठी साहित्याचे जागतिकीकरणाचे अनेक पडसाद उमटलेले दिसून येतात. त्या अनुशंगाने स्त्रीवादी साहित्याचा विचार प्रस्तुत विवेचनात केला जाणार आहे. प्रारंभी जागतिकीकरण या संकल्पनेबाबात काहीएक विचार करून स्त्रवादी साहित्य संकल्पना आणि जागतिकीकरणाता परिणाम झालेल्या काही कलाकश्तींचा विचार प्रस्तुत ठिकाणी केला जाणार आहे.

जागतिकीकरण ही संकल्पना अलिकडच्या वीसएक वर्षात उदयाला आलेली संकल्पना आहे असे प्रारंभी नमुद करावे लागेल. आज आपण जागतिकीकरण हा शब्द ग्लोबलायझेशन या अर्थाने वापरतो. जागतिकीकरण आणि मराठी स्त्रीवादी साहित्य या अनुषंगाने मांडणी करताना जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या प्रष्नातून साहित्याची मांडणी झालेली दिसून येते. कथा, कादंबरी, कविता याच्या माध्यमातून जागतिकीकरणाने निर्माण झालेल्या प्रष्नांची मांडणी अलिकडच्या काही वर्शातील मराठी साहित्यावर नजर टाकल्यास याची जाणीव झाल्यावाचून राहत नाही. जागतिकीकरण ही संकल्पना अर्थशास्त्राशी निगडीत असली तरी वाङ्मय व्यवहारावरही जागतिकीकरणचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

जागतिकीकरणाने जशा चांगल्या गोश्टी आणल्या तसचे त्याचे दुष्परिणामही मानवी जीवनावर झाले. मूल्य, संस्कार, नातीगोती, श्रम, यासारख्या काही गोष्ठींना जागतिकीकरणाने



ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GADHINGLAJ Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj. Dist.Kolhapur.

संबंध आणि सेवाभावी संस्थाने खरे रूप या निमित्ताने चित्रित झालेले दिसून येते.

मेघना पेठे यांची नाचितिरामि ही कादंबरीही जागतिकीकरणाचे नवे भान देणारी आहे. जागतिकीकरणाने स्त्रीला आलेल्या नव्या आत्मभानाची कहाणी प्रस्तुत कादंबरीमध्ये आलेली दिसते. प्रेमात आलेल्या नैराष्याला कवटाळून न बसता एका नव्या जोमाने जगणे या कादंबरीतील नायिका स्वीकारते. नवरा हा फक्त विरजणापुरता हे नवे भान आलेली नायिका प्रस्तुत कादंबरीत पहावयास मिळते. जागतिकीकरणाचा प्रभाव असणारे उर्मिला पवार यांचे आयदान हे आत्मकथन होय. जागतिकीकरणाने झालेल्या चांगल्या वाईट परिणामांचा वेध प्रस्तुत आत्मकथनामध्ये झालेला पहावयास मिळतो. दलित स्त्रियांसमोर वर्तमान जगण्यातील प्रष्न, जातपंचायत, कुटंबव्यवस्था, समाज यांची स्त्रियांकडे पाहण्याचा दशश्टिकोन या सर्व गोश्टी नव्या अनुभव विष्वातून आपल्या समोर येताना दिसतात. प्रज्ञा पवार यांच्या आरपार लयीत प्राणांतिक या कवितेतून एका तमासगीर स्त्रीचा जीवनाचा वेध घेतला गेला आहे. नवभांडवलषाही व्यवस्थेमध्ये एक कलावंत असणाऱ्या विठा भाऊ मांग या स्त्रीची आत्मभानाची कहाणी या कवितेतून मांडली गेली आहे. जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या अव्हानांना ताठ मानेने समोरे जाण्याचे काम विठा करते. स्वत:चा षोध घेत नव्या जगात स्वत:ची नवी ओळख निर्माण करण्याचे काम प्रज्ञा पवार यांनी विठाच्या माध्यमातून केले आहे असे म्हणावे लागेल. स्त्रीवादाचा प्रभाव असणारे स्त्रीलिखित मराठी नाटक मराठी नाटय वाङ्मयात लक्षणीय असे दिसून येत नाही. तरीही काही थोडेफार प्रयत्न मराठीत झाले आहेत असे नमुद करावे लागेल. जागतिकीकरणाचा फारसा परिणाम जरी या नाटकांवर पडला नसला तरी काही प्रष या निमित्ताने मांडले गेलेले दिसून येतात. स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्त्रियांच्या प्रष्नांचा वेध घेणाऱ्या स्त्री—नाटककारांमध्ये तारा वनारसे (कक्षा), कुमुदिनी रांगणेकर (आंधळी कोषंबीर), सरिता पदकी (बाधा), विभावरी षिरूरकर (अलौकिक संसार, कलियुग ग बाई कलियुग, हिरा जो भंगला नाही) या नाटकांचं स्थान उल्लेखनीय आहे.

**सरांश—**

जागतिकीकरणाचा जसा सर्व मानवी जीवनावर परिणाम झाला तसाच साहित्यावरहीझालेला दिसून येतो. जागतिकीकरणामुळे आलेले नवे भान, आणि त्यातून निर्माण झालेल्या नव्या प्रष्नांचा वेध स्त्रीवादी साहित्याने घेतलेला दिसतो. असे असले तरी तो जागतिकीकरणाचा स्त्रीजीवनावर झालेला परिणामाचा म्हणवा तितका वेध मराठी साहित्यात झालेला दिसून येत नाही.

## संदर्भ सुची :-


१. समकालिन स्त्रियांच्या कादंबऱ्या— किषोर सानप
२. जागतिकीकरण, समाज आणि मराठी साहित्य— डॉ रवींद्र षोभणे
३. स्त्रीवा आणि मराठी साहित्य — डॉ. वंदना महाजन
४. प्रवाह आणि प्रतिक्रीया — डॉ. रवींद्र ठाकूर




ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur. GADHINGLAJ
I/C. PRINCIPAL
Arts, Commerce & Science College
Gadhinglaj, Dist. Kolhapur.